साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

वर्ष 31 वे

| परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर, मो.९४२३३३७४८०
| www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१५६ | पाने–१२ | दि.१५/१२/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
स्थलांतर.. स्थलांतर..
शिवम
स्टिल ॲन्ड सिमेंट एजन्सी
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
खडी, क्रॅशसॅण्ड योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे
(9850125561, 9423339966)
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ, शेजारी, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

# करमाळ्यात म्हाडाच्या तीन बिल्डींग पूर्ततेच्या मार्गावर

## ९६ पैकी फक्त ६ जणांचे हप्ते जमा – हप्ते न भरल्यास नवीन लॉटरी काढणार

करमाळा : करमाळा शहरातील ज्या नागरिकांचे वार्षिक उत्पन्न तीन लाखाच्या आत आहे, अशा नागरिकांना म्हाडा अंर्तगत प्रधानमंत्री आवास योजनेतून सदनिका (वन बीएचके) देण्याबाबत सन २०२१ मध्ये कार्यवाही सुरू झाली होती. त्यामध्ये ४०० जणांचे अर्ज आले होते. त्यापैकी ९६ जणांनी वेळेत कागदपत्र पूर्ण केल्याने म्हाडा अंतर्गत या सर्वांना सदनिका देण्याचे जाहीर झाले. यासाठी प्रत्येक लाभधारकास २ लाख ५० हजार रूपये अनुदान दिले जाणार आहे.


म्हाडा अंतर्गत मध्यमवर्गीय नागरीकांना ४३५ स्क्वे.फुटाच्या सदनिका देण्यासाठी म्हाडाच्या माध्यमातून १० डिसेंबर २०२० ला अर्ज मागविले होते. त्याची मुदत११ जानेवारी २०२१ पर्यंत होती. त्या कालावधीत ४०० नागरीकांनी अर्ज केले होते. त्यानंतर करमाळा शहरातील मौलाली माळानजीक असलेल्या गट नं.२३८/१ (पान ४)



म्हाडाच्या तीन बिल्डींगमध्ये ९६ सदनिका पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. या योजनेनुसार अडीच लाख अनुदान वजा जाता ७ लाख २५ हजारकिंमतीस एक सदनिका लाभधारकास देण्यात येत आहे. त्यानुसार म्हाडाने पहिला हप्ता ४ लाख रूपयाची मागणी केली आहे. असे असलेतरी ९६ पैकी फक्त ६ जणांनी ४ लाखाचे हप्ते दिलेले आहेत. ९० जणांनी हे हप्ते दिलेले नाहीत. त्यामुळे तात्काळ संबंधितांनी हप्ते भरले नाहीतर त्यांची नावे लाभधारकांच्या यादीतून कमी करण्यात येतील व अन्य लाभधारकांची लॉटरी काढण्यात येईल. त्यानुसार त्यांच्याकडून हप्ते घेऊन त्यांना या सदनिका बांधकाम पूर्ण होताच ताब्यात देण्यात येतील.

...गणेश गंगावारे (शाखा अभियंता, म्हाडा शाखा-करमाळा)

॥ द्वितीय पुण्यस्मरण ॥



तुमच्या प्रेमाचा ओलावा
कशातच नाही असा गोडवा
तुमच्या आठवणींपेक्षा
आम्हांस तुमचा सहवासच भेटावा
अजुनही वाट पाहती हे नयन
यावे परतुनी आपण...
पुन्हा लाभावा तुमचा सहवास,
एवढाच आमचा अट्टाहास..!

'आबा'

द्वितीय पुण्यस्मरणदिनानिमित्त
आपल्या पवित्र स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली

19 डिसेंबर

स्व.नानासाहेब (आबा) विश्वनाथ वीर
(जन्म दि.४/९/१९६५, मृत्यू दि.१०/१२/२०२१)
(पुण्यस्मरण दि.१९/१२/२०२३)

शोकाकुल
ॲड.कमलाकर वीर, श्री.रमेश(भाऊ) वीर, श्री.अरूण(काका) जगताप
श्री.पंकज नानासाहेब वीर, ॲड.प्रितम नानासाहेब वीर व समस्त वीर परिवार, करमाळा.

संकटावर मात करण्यासाठी नवी कल्पकता व सातत्य पाहिजे.

## संपादकीय.............................................!

# दूध..!

सध्या शेतकऱ्याच्या दुधाच्या भावाचा प्रश्न चर्चेत आहेत. बाटलीतील पाणी ३०-३५ रूपये लिटर आणि शेतकऱ्याच्या शुध्द दुधाला २८ रूपये लिटर सुध्दा भाव मिळू नये; यासारखे दुसरे दुर्दैव नाही. दुसऱ्या बाजूला दुधाची स्थिती नीट समजून घ्या...

संदेशच्या अंकाचे गट्ठे सकाळी सकाळीच म्हणजे पावणे सहा वाजता कार्यालयात घेऊन आलो होतो. त्यावेळी कार्यालयापासून काही अंतरावर एक दुध विकणारा एका केटलीतील दुध मापाने काढत होता व जवळ असलेल्या दुसऱ्या बाटलीत ओतत होता. विशेष म्हणजे त्या बाटलीत अगोदरच साधारणत: पावशेर पाणी ओतलेले होते, त्यात दुध ओतात होता. अंदाजे एक लिटर दुध झाले की तो दुसरी बाटली भरत होता. अशाप्रकारे त्याने आठ बाटल्या भरल्या. त्यानंतर तो दुधवाला लगबगीने नियाला. जाताना त्याने त्या बाटल्या वेगळ्या पिशवीत ठेवल्या होत्या. साधरणत: वळण मारून ५०० फुटावर गेला असेल नसेल तोपर्यंत दारात तो सायकलसह उभा होता व मोठ्याने म्हणाला दुध... एक ९-१० वर्षाची मुलगी आली, तीच्या हातात त्याने ती बाटली दिली. त्या मुलीच्या हातात दुधाची बाटली पडताच ती एकदम खुष झाली व बाटली घेऊन पळतच घरात गेली. बहुतेक ती दुधवाल्याची वाट पहात असावी. हा प्रसंग मी एकाला सांगितला, तो म्हणाला, 'दुधवाल्याचे असेच असते. काही लोक दुधात पाणी टाकत नाही पण पाण्यात दुध टाकत असतात. बाटलीत अगोदरच पाणी ठेवतात, त्यात धार काढतात. विशेष म्हणजे ग्राहकाच्या उपस्थितीत बिगरपाण्याचे दुध म्हणून ते दुध विकतात.' याच अनुसंधाने व्हॉटस्‌अपवर नुकतीच एक चित्रफित पाहिली. त्यात रेल्वेस्टेशनचा चहावाला चहामध्ये केमीकल वापरून दुध तयार करून तेच दुध चहात वापरतो. याबाबत तो दुध कसे बनवले ते दाखवतो तसेच २० रूपयात पाच लिटर दुध तयार मिळत असेलतर जास्त पैसे कशाला खर्च करायचे ..? अस्सल दुध वापरले तर मला काहीच परवडणार नाही; असा त्याचा युक्तीवाद आहे. या दुधाने ग्राहकाला काय त्रास होतो याचा तो आजिबात विचार करत नाही.

मध्यंतरी दुधाच्या पावडरबाबत अशाच चर्चा कानावर येत होत्या. दुधाच्या पावडरमध्ये उंदराच्या लेंड्या, मेलेल्या पाली असतात. केळीची पावडर मिसळलेली असते वगैरे.. वगैरे.. तर दुध पिशवीबाबतही काहीबाही ऐकायला मिळते. पॅकींग पिशवी फोडून त्यात पाणी मिसळून पुन्हा पॅक केली जाते म्हणजे अगोदर मलई व साई काढली जाते, त्यात पुन्हा पाणी टाकले जाते.

एका बाजुला ग्राहकांवर अन्याय करणारे काही लोक आहेत. पण वर्षानुवर्षे ग्राहकांची सेवा करणारे व प्रामाणिक व्यवसाय करणारे दुध व्यवसायिक मोठ्या प्रमाणात असून त्यांच्यावर सध्याच्या घडीला मोठा अन्याय होत आहे. गेल्या काही दिवसात दुधाचे भाव सतत कोसळत आहेत. सध्या ३.५ /८.५ स्निग्धांश असलेल्या दुधाला जास्तीत जास्त २८ रूपये लिटर भाव आहे. एका बाजुला एका लिटरला ६० रूपये भाव देणारे ग्राहक असून त्यांना चांगले दुध मिळत नाही आणि जे अत्यंत चांगले दुध देतात त्यांना मात्र लिटरला २८ रूपये भाव. अशा स्थितीत दुध उत्पादक व ग्राहक यांच्यात विषमता आहे. सध्या कडबा, पशुखाद्य, पेंड याचे भाव गगणाला भिडले आहेत. गाई/म्हैस यांच्या किंमती, मजुरांची मजुरी, शेतातील पाण्याची स्थिती, वीजेचा त्रास, त्यातून निर्माण केलेला घास, जनावरांवरील उपचार, औषधे, डॉक्टर यांचे शुल्क या सर्व बाबीचा विचार केलातर दुधाचा लिटरला खर्च येतो ३० ते ३५ रूपये आणि बाजारात त्याला भाव २८ रूपये लिटर मिळत असेलतर शेतकऱ्यांनी काय करावे ? हा सर्वांसमोर प्रश्न पडला आहे.

उत्पादीत दुधाची पावडर बनवली जाते. परदेशात दुधापेक्षा दुध पावडर मोठ्या प्रमाणात वापरली जाते. त्यामुळे दुध पावडर निर्यातीत भारताचे नाव मोठे आहे. अलीकडे केंद्र शासनाने दुध पावडर निर्यातीवर बंदी यातली आहे. त्यामुळे पावडर विकली जात नसल्यामुळे नवीन पावडर निर्माण केली जात नाही; पर्यायाने दुधाचा वापर थांबला आहे. अर्थातच दुधाचे भाव पडले आहेत. या स्थितीत सर्वांनीच सतर्क होण्याची गरज आहे. शक्यतो दुध विक्रेत्यांनी जे आपले ग्राहक आहेत, त्यांना चांगले दुध दिले पाहिजे. पाणी घालणाऱ्यांनी तात्काळ पाणी घालणे बंद केले पाहिजे. कारण प्रत्येक दुधवाला किमान ५० ते ६० रूपये लिटरने दुध विकतो. जर आपले बांधव २८ रूपये लिटरने निर्भेळ दुध देत असतील तर आपण ६० रू. लिटरने निर्भेळ दुध का देवु नये.. हा विचार केला पाहिजे.

दुसऱ्या बाजुला जे डेअरीला दुध जाते त्या दुधाबाबत डेअरीधारक तसेच दुध उत्पादक यांनी जेवढे दुध चांगल्या भावाने जाते तेवढे विकायला हरकत नाही; परंतु जर दुध कमी भावाने घेतले जात असेलतर त्या दुधाबाबत पर्यायी विचार करण्याची गरज आहे. कारण वरच्या पातळीवरही दुध घेणारे भाव पाडून घेऊन जास्त नफा मिळवण्याचा विचार करतात. कारण ते दुध घेऊन त्याचे उपपदार्थ बनवतात आणि उपपदार्थ नियमित भावात विकतात. दुधाचे भाव जसे कमी झाले त्यापटीत खावा, पेढा, मलई, पनीर, दही, चक्का, तुप यांच्या किंमती एक रूपयानीही कमी झाल्या नाहीत. मग जर दुधाच्या उपपदार्थाच्या किंमती कमी होत नसतील तर दुधाची किंमत कमी का..? याचा विचार होण्याची गरज आहे.

प्रसंग कठीण आहे. पण त्यावर मात करण्याची गरज आहे. एकाशी चर्चा करताना त्याने सांगितले, 'मी दुध डेअरीला घालत नाही.' म्हटलं 'का..?' 'काय त्याला भाव मिळत नाही, पगारीला थांबायचे, दुध डेअरीवाल्याच्या मागे लागा. तो विषयच सोडला.' म्हटलं 'दुधाचं काय करता..?' तो म्हणाला.. "आमच्या वस्तीवर छानपैकी एक भट्टी लावतो. त्यात वेड्या बाभळीची लाकडे टाकतो आणि मोठे पातेल्यात दुध ढवळतो आणि बनवतो खवा. खाव्याला स्थानिक ग्राहक भेटतात. त्यांना पिवर खावा मिळत असल्यामुळे खावा शिल्लक रहात नाही. रोज नवी ऑर्डर असते." लोकविकास संस्थेने (वांगी) दुधाचे उपपदार्थ बनवण्याचे तंत्रज्ञान हाती घेतले आहे. त्याचा त्यांना चांगला फायदा होत असून त्यांची वेगवेगळ्या ठिकाणी आऊटलेट (दुकाने) आहेत.

गावपातळीवरील दुध उत्पादक शेतकरी व संस्था या सर्वांनी आता सतर्क होण्याची गरज आहे. या प्रसंगात न घाबरता एकमेकाचे सहकार्य घेऊन यावर पर्याय काढण्याची ही वेळ आहे. जर यावेळी योग्य पर्याय काढलातर पुन्हा दुध व्यवसायाबद्दल चिंता करावी लागणार नाही. आजही मोठ्या शहरातून महागडे तुप, श्रीखंड, पनीर याची पार्सलने व मोठ्या पॅकींगमध्ये विक्री होते. मेडीकल, स्वीटमार्ट व खाद्यपदार्थाच्या दुकानात त्याची विक्री होते. तेच पदार्थ जर आपण तयार केले व त्याचे आकर्षक पॅकींग केले तर त्याची निर्मिती किंमत कमी होऊन ग्राहकाला स्वस्त मिळेल व दुध उत्पादकाला चांगले परवडेल. पेढे, मलई, बर्फी, कुंदा किंवा तसेच अन्य पदार्थ स्वीटमार्टमध्ये ३०० ते ४०० रूपये किलोने विकले जातात. २८ रूपये लिटरचे दुध, त्यात साखर व अन्य टेस्टी पदार्थ टाकून हे पदार्थ बनवले जातात. त्याचा खर्च साधरणत: एका किलोला १०० रूपये होतो व विक्री ३०० ते ४०० रूपये ! थोडा विचार केलातर हे प्रमाण किती विसंगत आहे. थोडे नियोजन व धाडसाची गरज आहे.

आता आळस सोडण्याची गरज आहे. कठीण प्रसंगच प्रत्येकाला शहणपण शिकवतात. संकटच माणसाला दिशा दाखवतात, त्याप्रमाणे या संकटात दुध उत्पादकांनी केवळ दुध उत्पादीत करून चालणार नाहीतर दुधावर प्रक्रिया करण्याचे धोरण आखण्याची गरज आहे. जर येथे मोठ्या प्रमाणात उपपदार्थ निर्माण केलेतर ज्याप्रकारे देवडीचा खावा, कुंतलगीराचा पेढा याप्रमाणे आपल्या तालुक्याचीही ओळख होऊ शकते. फक्त यासाठी धाडस करण्याची व नियोजन करून विचारपुर्वक पावलं टाकण्याची गरज आहे.


सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# कुगाव ते कळाशी पाण्यातील जोडमार्ग/पुल विकसित करावा : माजी सरपंच तेजस्विनी कोकरे

करमाळा (सं.प्र.): मराठवाड्याच्या विकासाला चालना देणारा व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा सर्वात जवळचा उजनी बॅकवॉटर परिसराच्या मध्यातून जाणारा हनुमान जन्मभुमी कुगाव (ता.करमाळा) ते कळाशी (ता.इंदापूर) पाण्यातील जोडमार्ग/पुल विकसित करावा; अशी मागणी कुगावच्या सरपंच तेजस्विनी दयानंद कोकरे यांनी केली आहे.

याबाबत माहिती देताना सरपंच दयानंद कोकरे यांनी सांगितले, की उजनी बॅकवॉटरच्या मध्यातून जाणारा हनुमान जन्मभुमी कुगाव ते कळाशी हा जोडमार्ग/पुल प्रस्तावित आहे. हा जोडमार्ग झाल्यास मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील अंतर १०० किलोमीटर कमी होणार आहे. मराठवाड्यासाठी पश्चिम महाराष्ट्रासह पुणे, मुंबईला जोडणारा सर्वात जवळचा मार्ग तयार होईल. हनुमान भक्तांची मागणी असणारा मार्ग (लोणी देवकर ते कुगाव) पूर्ण होऊन हनुमान भक्तांची गैरसोय दूर होईल.

आवाटी परिसरात येणाऱ्या मुस्लिम बांधवांची गैरसोय दूर होईल. दळणवळण अंतर कमी झाल्यामुळे पेट्रोल व डिझेलची मोठी बचत होईल. तरकारी मालाला पुणे,






मुंबई व जेएनपीटी बंदरामुळे परकीय बाजारपेठ उपलब्ध होईल. ३० लाख मेट्रीक टन ऊसासाठी पर्यायी कारखाने उपलब्ध होतील. केळी निर्यातीस जेएनपीटी बंदरावर जाण्यासाठी सर्वात जवळचा मार्ग उपलब्ध होईल (सध्या देशात सर्वाधिक केळीची निर्यात उजनी बॅकवॉटरच्या पूर्व परिसरातून होते). रोजगार निर्मितीच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढतील. उजनी बॅकवॉटर टुरिझम ट्रॅंगल परिसरातील पर्यटनाचा विकास होईल (भिगवण, टेंभूर्णी, करमाळा व भिगवण). दर्जेदार शिक्षणाची सोय होईल. आरोग्याची सोयी सुविधा उपलब्ध होतील. चित्रपटाचे चित्रीकरण होतील. उजनी बॅकवॉटर परिसरातील बोटींग व्यवसायाला प्रचंड चालना मिळेल. उजनी धरणात साधारण ६० हजार कोटी + ची वाळू आहे. त्यासाठी पर्यायी रस्ता तयार होणार. बलुतेदार व अलुतेदार यांच्या व्यवसायाला प्रचंड चालना मिळेल. मराठवाड्यातील हॉटेल व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढेल. रोटी बेटीचे संबंध वाढतील. मासेमारी बांधवांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल. आपल्या परिसरातील जमिनीच्या किंमती प्रचंड वाढतील. वाहतुकीची सोय उपलब्ध झाल्याने आपल्या परिसरात मोठमोठे उद्योगधंदे वाढण्यास मदत मिळेल. आपल्या परिसरात मुबलक पाणीसाठा असल्याने आपल्या भागात मोठ्या प्रमाणात घरे वाढतील. शहरी भाग व ग्रामीण भाग अंतर कमी होण्यास मदत होईल. फोटोग्राफी व्यवसायाला पर्यटकांमुळे चांगल्या पध्दतीने व्यवसाय वाढवण्याची संधी उपलब्ध होईल. व्यवसाय वाढल्याने जाहिरात क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना चांगल्या संधी उपलब्ध होतील. स्थानिक परिसरातील बेरोजगार युवकांना गावातच रोजगार निर्माण होईल. तसेच पश्चिम महाराष्ट्राला जोडल्याने मराठवाड्याच्या विकासाचा वेग प्रचंड वाढेल.

## धोंडिबा बागल यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : मांगी येथील ह.भ.प.धोंडिबा आप्पाराव बागल (वय-९०) यांचे वृध्दपकाळाने निधन झाले. त्याच्या मागे मुलगा, सुना व नातवंडे असा परिवार आहे. मांगी येथील ते वारकरी संप्रदायाचे पाईक होते. भजन, किर्तन, वारी यात त्यांचा वेळ जात असे. गावातील अत्यंत समजदार व सर्वसमावेशक व्यक्ती म्हणून त्यांची ओळख होती. पशुचिकित्स डॉ.भैरवनाथ बागल व अशोक बागल यांचे ते वडील होते.

## १८ डिसेंबरला सेवानिवृत्तांची आरोग्य तपासणी

करमाळा(सं.प्र.) : सेवानिवृत्त कर्मचारी संघ व वेलनेस परिवार करमाळा यांचे वडीने पेन्शन डे निमित्त १८ डिसेंबरला दुपारी एक वाजता श्री स्वामी समर्थ मंदिर फंडगल्ली करमाळा येथे सेवानिवृत्तांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य विषयक मार्गदर्शनही केले जाणार आहे. तरी या कार्यक्रमास सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी उपस्थित रहावे; असे आवाहन अध्यक्ष भागवत घाडगे, सचिव नारायण घोलप व महेश काळे, लहू राख, अशोक सांगळे यांनी केले आहे.

## १९ डिसेंबरला प्रभु श्रीराम मंगल अक्षता कलशची शोभायात्रा

करमाळा (सं.प्र.): प्रभु श्रीराम जन्मभूमी आयोध्या येथून आलेल्या श्रीराम मंगल अक्षता कलशची विधिवत पुजा करून कलशाची करमाळा शहरातून १९ डिसेंबरला भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. ही शोभायात्रा दुपारी चार वाजता मारूती मंदिर किल्लावेस येथून निघणार आहे. यामध्ये सर्व महिला व पुरूषांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे; असे आवाहन करण्यात आले आहे.

**रो-हाऊस विकणे आहे**

मथुरानगर मधील चांगल्या स्थितीतील रो-हाऊस योग्य किंमतीत विकणे आहे

• संपर्क •

मो.९४२३२३७६८५



# करमाळा येथील तहसीलदार म्हणून शिल्पा ठोकडे यांची नेमणूक

## सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी २४ तास उपलब्ध राहणार : तहसीलदार ठोकडे

करमाळा(सं.प्र.) : करमाळा येथील तहसीलदार म्हणून शिल्पा ठोकडे यांची नेमणूक झाली असून त्यांनी १२ डिसेंबर पासून करमाळा तहसीलदार पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. करमाळ्याचे तहसीलदार पद गेल्या सहा महिन्यापासून रिक्त होते. श्रीमती ठोकडे यांच्या नेमणुकीने तालुकावासियांची प्रतिक्षा संपली आहे.

श्रीमती ठोकडे माळशिरस येथील शेती महामंडळाकडे कार्यरत होत्या. शिल्पा ठोकडे यांची लेडीज सिंघम म्हणून सोलापूर जिल्ह्यात ओळख आहे. श्रीमती ठोकडे यांचा जन्म कुर्डूवाडी (ता.माढा) येथे झाला असून बालपण व शिक्षण कुर्डूवाडीत गेले. पदवीधर झाल्यानंतर त्यांनी सुरूवातीला पोलीस उपनिरीक्षक पदासाठी परीक्षा दिली होती व त्यामध्ये त्या निवडल्या होत्या. त्यानंतर काही दिवस त्यांनी एसपी अशोक कामटे यांच्या सोबतही काम केले. दरम्यान त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन त्या तहसीलदार पदी निवडल्या. सुरूवातीला सांगोला येथे नायब तहसीलदार म्हणून कार्यरत होत्या. त्यानंतर कोल्हापूर येथे पुरवठा अधिकारी तर दक्षिण सोलापूर येथे तहसीलदार म्हणून काम केले आहे. दक्षिण सोलापूर येथे कार्यरत असताना वाळू माफियाच्या कर्दनकाळ म्हणून त्यांची ओळख निर्माण झालेली आहे. त्यानंतर आजर येथे तहसीलदार म्हणून कार्यरत होत्या. अलिकडे माळशिरस येथील शेती महामंडळाकडे त्या कार्यरत होत्या.

करमाळा येथील तहसीलदार पदाचा पदभार स्विकारल्यानंतर शिल्पा ठोकडे यांचा तालुक्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



माझा फोन २४ तास चालू असून, माझ्या कार्यालयाचे दार सदैव सर्वसामान्यांसाठी थेट उघडले आहे; असे प्रतिपादन तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी पत्रकारांच्या वतीने करण्यात आलेल्या सत्कार प्रसंगी केले. पुढे तहसीलदार ठोकडे म्हणाल्या, की मळ्यातील पत्रकार म्हणजे माझे कान, नाक, डोळा असून त्यातील विविध प्रश्न त्यांनी माझ्यापर्यंत पोहोचवण्याचे काम करावे. महसुल प्रशासनाच्या कामात काही त्रुटी असतील त्या सुध्दा माझ्या निदर्शनास आणून द्याव्यात. येणाऱ्या काळात भयंकर दुष्काळ पडण्याची चिन्हे असून यासाठी पिण्याचा पाणीपुरवठा व जनावरांचे वैरण, मजुरांच्या हाताला काम या प्रश्नावर आपले लक्ष केंद्रीत राहणार आहे. कवठेमहाकाळ सारख्या दुष्काळी तालुक्यात मी काम केले असल्यामुळे दुष्काळ मला नवीन नाही; पण या दुष्काळाच्या झळा करमाळा तालुक्यातील जनतेला बसू देणार नाही.

पान १ वरून पुढे...

# करमाळ्यात म्हाडाच्या तीन बिल्डींग पूर्ततेच्या मार्गावर

व गट नंबर २३९ मध्ये हा प्रकल्प राबविण्याची प्रक्रिया सुरू झाली. सुरूवातीला नव्याने ७७ सदनिका मंजुर केल्या होत्या. त्यामध्ये अनुसुचित जाती साठी-८ व अनुसुचित जमातीसाठी-५ घरे राखीव ठेवली आहेत. या सदनिकेचे संपुर्ण बांधकाम ४१.०५ चौ.मी. म्हणजे ४४६ चौ.फुट असणार आहे. त्यासाठी ७ लाख २५ हजार रूपये भरणे आवश्यक आहे. अर्जदाराचे नावावर कोठेही पक्के घर चालत नाही. तसेच अर्जदाराची पंतप्रधान आवास योजनेत नोंदणी आवश्यक असते. एकंदरीत जागेच्या उपलब्धतेनुसार ९६ सदनिका मंजूर केल्या आहेत.

सन २०२१ नंतर मौलालीमाळावर ३२ सदनिकाच्या तीन बिल्डींग उभा राहिलेल्या आहेत. यामध्ये एका बिल्डींगचे काम ८५ टक्के, दुसऱ्या बिल्डींगचे काम ८० टक्के तर तिसऱ्या बिल्डींगचे काम ६० टक्के झालेले आहे. ९६ सदनिका पैकी अवघ्या ६ जणांनी प्रत्येकी ४ लाखाचा हप्ता भरलेला आहे. अन्य ९० जणांनी अद्याप कुठलेही हप्ते भरलेले नाहीत.

# ज्योर्तिलिंग गणेश मंडळ तर्फे गुणवंतांचा सन्मान



करमाळा(सं.प्र.) : कुंभेज येथील ज्योतिर्लिंग गणेश तरूण मित्र मंडळाच्या वतीने गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये कुंभेज गावचे सुपुत्र व राज्य करनिरीक्षक म्हणून निवड झालेले महेश तोरमल तसेच जिल्हा परिषद शाळेतील सातवीच्या विद्यार्थ्यांनी राज्य पातळीवरील खो-खो स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल सायली भोसले, स्नेहल भोसले, श्रावणी कन्हेरे, अनुष्का थोरे, सिध्दी काळे, स्नेहल शिंदे यांचा व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक मुलाणी सर यांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर कुंभेज सोसायटी चे नूतन संचालक रामभाऊ मोरतळे, नानासाहेब सातव यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षक कन्हेरे गुरूजी हे होते. या कार्यक्रम प्रसंगी राष्ट्रीय पंच असणारे शिक्षक मुलाणी, राज्य कर निरीक्षक महेश तोरमल यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी उपसरपंच संजय तोरमल, चेअरमन युवराज भोसले, मच्छिंद्र तोरमल, अध्यक्ष दशरथ मोरतळे, उपाध्यक्ष गजानन तोरमल, इन्नुस पठाण, विजय शिंदे, तानाजी चौगुले, अनिल कादगे, संतोष चांदणे, नवनाथ तोरमल, सोमनाथ मुटके, एकनाथ तोरमल, राजाभाऊ गुटाळ, बिभिषण कन्हेरे, पैगंबर पठाण, संतोष घोरपडे, अमीन पठाण, लाला तोरमल, नवनाथ गायकवाड, तोरमल मेजर, बाबा माळी यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमोल मुटके यांनी केले तर उपस्थितांचे आभार मंडळाचे सचिव गणेश शिंदे यांनी मानले.

# राज्यस्तरीय हॅन्डबॉल स्पर्धेत साक्षी कुदळेची चमकदार कामगिरी



करमाळा(सं.प्र.) : अमरावती येथे झालेल्या राज्यस्तरीय हॅन्डबॉल स्पर्धेत पुणे संघाने प्रथम क्रमांक पटकावला असून, यामध्ये जेऊर येथील नूतन हॅन्डबॉल असोसिएशनची साक्षी नागनाथ कुदळे हिने चमकदार कामगिरी केली आहे. अमरावती (धामणगाव) येथे ४१ वी हॅन्डबॉल ज्युनिअर राज्यस्तरीय मुली स्पर्धा ९ ते ११ डिसेंबर या कालावधीत झाली. या स्पर्धेत पुणे संघाचा प्रथम क्रमांक आला आहे. यात जेऊर येथील नूतन हॅन्डबॉल असो; च्या साक्षी कुदळे हिने चमकदार कामगिरी केली. साक्षी हिला नूतन हॅन्डबॉल असोसिएशनचे सचिव विनोद गरड यांचे मार्गदर्शन लाभले. साक्षी कुदळे ही नागेश रिफ्रिजरेटर दुकानचे मालक नागेश कुदळे यांची कन्या आहे. यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार नारायण पाटील, सचिव प्रा.अर्जुन सरक, सरपंच पृथ्वीराज पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती अतुल पाटील, उपसरपंच नागेश झांजुर्णे, संतोष नुस्ते, नौशाद जहागिरदार यांनी साक्षी हिचे अभिनंदन केले.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर




रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
fastrack
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

श्री गजानन अगरबत्ती



• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

# करमाळा शहर शिवसेना प्रमुख पदी नागेश काळे



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहर शिवसेना प्रमुख पदी नागेश काळे (गुरव) यांची निवड करण्यात आली. निवडीचे पत्र शिवसेनेचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य व माजी आमदार कृष्णा भेगडे, जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजी सावंत यांचे हस्ते श्री.काळे यांना देण्यात आले.

नागेश काळे हे तीस वर्षापासून शिवसेनेचे कट्टर कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख साईनाथ अभंगराव, दिवंगत ॲड.शिवाजीराव मांगले यांच्यासोबत त्यांनी करमाळ्यात शिवसेना मजबूत करण्याचे काम केले होते. सध्या ते करमाळा शहर उपप्रमुख म्हणून कार्यरत होते. श्री.काळे हे खोलेश्वर आरती मंडळाचे अध्यक्ष असून या मंडळाचे शंभर सदस्य आहेत. नागेश काळे यांच्या निवडीमुळे जुन्या शिवसैनिकांना न्याय मिळाला; अशी भावना शिवसैनिकातून व्यक्त केली जात आहे.

> शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या नेतृत्वाखाली करमाळा शहरातील १७ प्रभागात शिवसेनेची शाखा स्थापन करणार असून घर तेथे शिवसैनिक व शिवदूत असा उपक्रम राबवणार आहे. तसेच नगरपालिका क्षेत्रातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी वेळप्रसंगी तीव्र आंदोलन करणार..!
>
> **..नागेश काळे (शिवसेना शहरप्रमुख)**

पंढरपूर येथे झालेल्या बैठकीत नागेश काळे यांचा प्रा.शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी सत्कार केला. यावेळी शिवसेनेचे करमाळा विधानसभा अध्यक्ष राहुल कानगुडे, उपता.प्रमुख दादासाहेब थोरात, नवनाथ गुंड, महिला आघाडीच्या जि.उपप्रमुख ज्योतीताई शिंदे, पंढरपूर ता.प्रमुख शिवाजी बाबर, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय सावंत उपस्थित होते.

# करमाळा तालुक्यात प्रथमच आगळा-वेगळा गणित समारंभ संपन्न

करमाळा(सं.प्र.) : श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठान संचलित नवभारत इंग्लीश मेडियम स्कुल व ट्विंकलींग स्टार्स मध्ये गणित विषयाशी संबंधित आगळा-वेगळा समारंभ कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास गुंजकर साहेब, डॉ.प्रविण देशमुख, बलदोटा सर, गायकवाड सर, आगरवाल सर, सौ.जबुआणी मॅडम, गरीया मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. सरस्वती पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पाहूण्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गणित विषयाचे महत्व पटवून देणारी गाणे, नाटिका, नृत्य आदी कला सादर केल्या. तसं पाहिलंतर गणित विषय म्हटलं की, मुलांना खूप टेन्शन येते आणि या टेन्शनमुळेच त्यांचा गणिताकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. त्यामुळेच त्यांना गणित विषय हा अवघड वाटू लागतो. तो विषय सोपा कसा करावा व मुलांच्या मनातील गणिताविषयी असलेली भीती कशी दूर करावी हे या समारंभातून सांगण्याचा उद्देश होता. या कार्यक्रमात एलकेजी ते दहावी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. गणित समारंभ म्हणजे नक्की काय आहे हे सर्वप्रथम नवभारत इंग्लीश मेडियम स्कुलने एक आगळा-वेगळा उपक्रम घेऊन संपूर्ण तालुक्याला दाखवून दिले. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, संचालिका सुनिता देवी, अमोद संचेती, चंद्रकांत देवी, विजयकुमार दोशी यांचेसह सर्व शिक्षक, पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुख्याध्यापिका सुनिता मोहिते यांनी केले तर उपस्थितांचे आभार शिक्षिका मेघाली शेटे यांनी मानले.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
होलसेल साडी डेपो
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
दिवाळीनिमित्त खास ऑफर...
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट)
मो.7387832186
घरगुती विक्रीसाठी साड्या होलदरात मिळतील

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
उपलब्ध सुविधा...
- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# जातेगाव ते टेंभूर्णी महामार्गाचे चौपदरीकरण होणार

## टेंडर प्रक्रिया सुरू : आ.शिंदे यांची माहिती



करमाळा(सं.प्र.) : करमाळा मतदार संघाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा विषय असलेल्या जातेगाव ते टेंभूर्णी या ६०.१२ किलोमीटर लांब असलेल्या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम होणार असून हे काम BOT तत्वावर होणार आहे. या प्रकल्पासाठी ९३५.६६ कोटी खर्च अपेक्षित आहे. या महामार्गाच्या टेंडर प्रक्रिया संदर्भात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे महाव्यवस्थापक एन.एल.यवतकर यांच्या सहीने ११ डिसेंबर रोजी अधिसूचना प्रसिध्द झाली आहे; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

याबाबत जादा माहिती देताना आ.शिंदे म्हणाले, की करमाळा तालुक्याच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा व संवेदनशील विषय होता. जातेगाव ते टेंभूर्णी या महामार्गावर आत्तापर्यंत वेगवेगळ्या अपघातामध्ये जवळपास दोनशे पेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. अनेकजण जखमी झालेले आहेत हा रस्ता महाराष्ट्र शासनाकडे होता, तो रस्ता भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरीत होण्यासाठी आपण शासन दरबारी विशेष प्रयत्न केले होते. त्यानुसार हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणकडे हस्तांतरीत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ना हरकत दाखला दिला. हा रस्ता प्राधिकरणाकडे हस्तांतरीत झाल्यामुळे रस्त्याच्या देखभाल दुरूस्तीचे काम हे आता महामार्ग प्राधिकरणाकडून केले जाणार आहे. ऑनलाइन पोर्टलवरून ११ डिसेंबर पासून कामाचे टेंडर भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून अंतिम मुदत २९ जानेवारी २०२४ पर्यंत आहे. ३० जानेवारीला टेंडर उघडले जाईल. या रस्त्यामुळे करमाळा तालुक्याचा नगर व सोलापूर जिल्ह्यांशी जोडण्याचा मार्ग सुकर होणार आहे. तसेच मध्य रेल्वे व राष्ट्रीय महामार्गालाही करमाळा जोडले जाणार आहे. या रस्त्याचे काम मंजूर करण्यास मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे सहकार्य मिळाले असल्याचे आ.शिंदे यांनी सांगितले.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री


डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी
२०० रू. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा



शहरप्रमुख-शिवसेना
करमाळा शहर शिवसेना प्रमुख पदी
मा.श्री. नागेश काळे (गुरव)
यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !
श्री.राहुल परदेशी
तबरेश सय्यद
श्री.किशोर शेळके
शुभेच्छुक
■ बालाजी वीट सप्लायर्स, कर्जत रोड, करमाळा.
■ न्यू दुर्गा हॉटेल, कर्जत रोड, करमाळा. (प्रोप्रा : परदेशी बंधू)
■ स्वामी समर्थ हायटेक, करमाळा. ● एस.जी.एस. वीट कारखाना


॥ प्रथम पुण्यस्मरण ॥
A LIFE TIME IN OUR HEARTS
कै.सौ.वैजयंतीमाला मिश्रीलाल अब्बड(मम्मी)
(जन्म दि.६/१२/१९५९, मृत्यू दि.१७/१२/२०२२)
आई.., जरी आम्ही तुला पाहू शकत नसलो
तरीही तु दररोज आमच्यासोबत आहेस
जे प्रेम तू आम्हा सर्वांना आयुष्यात दिलेस
ते मरण हिरावून घेऊ शकत नाही
आई.., तुझी खूप आठवण येते!
तुझ्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण प्रेमाची श्रध्दांजली!
तुझी.. मुले, सुना, जावई आणि नातवंड
टीप : पुण्यस्मरण दिनानिमित्त सोमवार दि.१८/१२/२०२३ रोजी सायंकाळी महाप्रसादाचे आयोजन केले आहे.
स्थळ : श्री हिराभारती महाराज मठ, सावडी, ता.करमाळा.


शहरप्रमुख, शिवसेना
जिल्हाप्रमुख
आमचे मित्र
मा.श्री. नागेश काळे (गुरव)
यांची करमाळा शहर शिवसेना प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
● जाधव खडीक्रेशर, करमाळा.
● प्रगती मशिनरी स्टोअर्स अँन्ड हार्डवेअर, करमाळा.
● आपोलो टायर्स, करमाळा ● साई ट्रेडर्स, करमाळा
● लोकप्रिय हनुमान तरूण मंडळ, किल्लावेस, करमाळा
● खोलेश्वर आरती मंडळ, करमाळा.


भावपूर्ण
दैवत
श्रध्दांजली
स्व.नानासाहेब (आबा) विश्वनाथ वीर
(पुण्यस्मरण दि.११/१२/२०२३)
तुमचं असणं सर्व काही होतं
आयुष्यातील ते सुंदर पर्व होतं
आज सर्व काही असल्याची जाणीव आहे
पण.. आबा तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे
स्व.नानासाहेब (आबा) वीर
यांचे द्वितीय पुण्यस्मरणादिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली !
शोकाकुल
श्री.चंद्रकांत राखुंडे व परिवार
माजी शहाराध्यक्ष, भारतीय जनता पार्टी


एस.एस.के.एस. असोसिएटस्
अकौंट मॅनेजर पाहिजेत
सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)
पदासाठी अटी खालीलप्रमाणे..
● कामाची वेळ : सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार ॲडजेस्ट)
● पात्रता : कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
● पगार : ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.
संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)
पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टसमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.
टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.


द्वितीय पुण्यस्मरण
ज्योत अनंतात विलीन झाली
स्मृती आठवणींना दाटून आली
भावसुमनांची ओंजळ भरूनी
आपल्या द्वित्तीय पुण्यस्मरण दिनी
वाहतो आम्ही श्रध्दांजली !
स्व.नानासाहेब (आबा) विश्वनाथ वीर
शोकाकुल
महादेव भोसले, प्रसाद महादेव भोसले
प्रसन्ना महादेव भोसले
समस्त भोसले परिवार, श्रीदेवीचामाळ


शिवसेना
मुख्यमंत्री
जिल्हा संपर्कप्रमुख
जिल्हाप्रमुख
उपजिल्हाप्रमुख
करमाळा शहर शिवसेना प्रमुख पदी
मा.श्री.नागेश काळे (गुरव)
यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
माजी ता.प्रमुख
ता.प्रमुख
ता.उपप्रमुख
ता.उपप्रमुख
जितेंद्र सुरवसे
देवानंद बागल
दादासाहेब थोरात
नवनाथ गुंड
डॉ.बाळासाहेब कारंडे
शिवसेना प्रवक्ते
विधानसभा ता.अध्यक्ष
जिल्हा उपप्रमुख
ता.प्रमुख
ॲड.शिरीष लोणकर
राहुल कानगुडे
सौ.जोतीताई शिंदे
सौ.प्रियंका गायकवाड
(शिवसेना महिला आघाडी)
शुभेच्छुक
शिवसेना करमाळा शहर व तालुका

# करमाळा येथील लोकअदालत मध्ये २३२ प्रकरणे निकाली

## १२ कोटी २७ लाख ६८ हजार रूपयाची वसुली



करमाळा(सं.प्र.): महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा सोलापूर विधी सेवा समिती अध्यक्ष श्री.आजमी व सचिव नरेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा तालुका विधी सेवा समिती व करमाळा वकिल संघ यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायालय वरीष्ठस्तर चे न्यायाधीश एम.पी.एखे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या लोक अदालत मध्ये २३२ प्रलंबित दिवाणी तसेच तडजोड पात्र फौजदारी खटले व दाखल पूर्व प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. त्यात १२ कोटी २७ लाख ६८ हजार २२० रूपयांची वसुली झाली आहे.

लोकन्यायालयाचे उद्घाटन न्यायाधीश एखे, न्यायाधीश आर.ए.शिवरात्री, सहदिवाणी न्यायाधीश बी.ए.भोसले यांचे हस्ते झाले. याप्रसंगी वकिल संगाचे अध्यक्ष दत्तात्रय सोनवणे, वकिल संघाचे सदस्य उपस्थित होते. लोकअदालत विषयी न्यायाधीशांनी मनोगत व्यक्त केले. या लोकअदालतमध्ये करमाळा न्यायालयात प्रलंबित असलेले दिवाणी व फौजदारी असे ५७८३ व दाखलपूर्व १९५० असे एकूण ७७३३ प्रकरणे ठेवण्यात आली. यात दाखल पूर्व मधील २४ प्रकरणे निकाली काढून त्यात ४३ लाख ७६ हजार १५८ रूपये व प्रलंबित प्रकरणातील २०८ प्रकरणे तडजोडीने निकाली काढून त्यात ११ कोटी ८३ लाख ९२ हजार रूपये वसुली झाली. या लोकअदालतसाठी दिवाणी न्यायाधीश एम.पी.एखे, न्यायाधीश बी.ए.भोसले यांचे दोन पॅनल करण्यात आले होते. बँकेच्या व नगरपालिका रिकव्हरीच्या २४ प्रकरणात तडजोड होऊन त्यात ४३ लाख ७६ हजार १५८ रूपयाची वसुली झाली. प्रलंबित तडजोड पात्र फौजदारी प्रकरणातील ८३ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. त्यामध्ये ५ लाख ३५ हजार ७०० रूपये इतका दंड वसुल करण्यात आला. लोकअदालत यशस्वी करण्यासाठी वकिल संघाचे सर्व सदस्य, सर्व न्यायालयीन कर्मचारी, पोलीस कर्मचारी, बँक तसेच फायनान्सचे प्रतिनिधी यांचे विशेष सहकार्य लाभले.

# कमलादेवी मंदिर जतन व संवर्धन कामासाठी १ लाख २२ हजाराची देणगी



करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील श्री कमलादेवी मंदिर जतन व संवर्धन कामासाठी धायरिखंडी येथील कमलेश मोहन माने यांनी एक लाखाची देणगी दिली आहे. तसेच प्रसाद परब (रा.मुंबई) यांनी अकरा हजार रूपये व चि.ध्रुव याच्या वाढदिवसा-निमित्त रविराज पुराणिक (रा.श्रीदेवीचामाळ) यांनी अकरा हजार रूपये देणगी दिली आहे. मंदिर समितीच्या वतीने माने, परब व पुराणिक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष सोमनाथ चिवटे, सचिव अनिल पाटील, विश्वस्त डॉ.प्रदीपकुमार पाटील, डॉ.महेंद्र नगरे, सुशिल राठोड, राजेंद्र वाशिंबेकर, ॲड.शिरीष लोणकर, रोहित पुजारी, सचिन सोरटे, धनंजय सोरटे, प्रशासन अधिकारी महादेव भोसले, व्यवस्थापक अशोक गाठे उपस्थित होते.




# कुऱ्हाडीनं हल्ला करून पळालेला दरोडेखोर विहिरीत पडला

करमाळा(सं.प्र.): कोर्टी येथे मध्यरात्री एक ते दीड वाजण्याच्या दरम्यान पाच ते सहा जण एका शेतकऱ्याच्या घरावर दरोडा टाकण्यासाठी आले. मात्र गोंधळ उडाल्याने ते पळत सुटले. त्यांच्यापैकी एक दरोडेखोर विहिरीत पडला आणि तो गंभीर जखमी झाला. यावेळी झालेल्या दगडफेकीत दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

नितीन उर्फ नीतू वैशा भोसले (रा.भेंडाळा, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) यासह पाच अनोळखी संशयित दरोडेखोरांवर करमाळा पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी भोसले यास पोलीसांनी ताब्यात घेऊन त्याला सोलापूर येथील शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. या प्रकरणी अनिल शिंदे (रा.कोर्टी) यांनी फिर्याद दिली. पोलीस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनूसार फिर्यादी अनिल शिंदे कोर्टी गावापासून काही अंतरावर ठाकरवस्तीवर राहतात. रविवारी मध्यरात्री एक ते दीडच्या सुमारास शिंदे यांना घराच्या खिडकीतून बॅटरीचा उजेड दिसून आला. त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता अनोळखी पाच ते सहा जण दबा धरून बसलेले दिसून आले. चोरट्यांनी अनिल शिंदे यांच्या पाठीवर कुऱ्हाडीने आणि पायावर धारदार शस्त्राने वार करून जवळ असलेला मोबाईल काढून घेतला. हा गोंधळ ऐकून शिंदे यांचा भाऊ कुमार हा मदतीला धावून आला. दरोडेखोरांनी तेथून पळ काढला. यावेळी दरोडेखोरांनी केलेल्या दगडफेकीत कुमार हा जखमी झाला. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील, पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे व गुन्हे प्रकटीकरण विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले. त्यांनी इतर आरोपींचा शोध सुरू केला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर हे करत आहेत.

# ऊसतोड मुकादमाकडून साडेचार लाखाची फसवणूक

करमाळा(सं.प्र.) : ऊसतोड मुकादमाने मजूर पुरवतो म्हणून साडेचार लाख रूपये उचल घेऊन कारखान्याला मजूर उपलब्ध करून दिले नाही व फसवणूक केली. अशी फिर्याद विठ्ठल पांडूरंग डोंगरे (रा.कुगाव) यांनी करमाळा पोलीसात दिली आहे. त्यात त्यांनी पद्मदास दासू राठोड, अमीन इन्नुस तडवी, गोकुळ विश्वनाथ चव्हाण (सर्व रा.जुनोनी, ता.जामनेर, जि.जळगाव) यांचे विरूध्द ही फिर्याद दिली आहे.

# किरकोळ कारणावरून तिघांकडून एकास मारहाण

करमाळा : दारात शेकोटी करू नको.. असे म्हटल्याने तिघा जणांनी एकास मारहाण केली आहे. हा प्रकार ९ डिसेंबरला रात्री साडेआठ वाजता कोर्टी येथे घडला आहे. यात गणेश सुभाष जाधव (रा.कोर्टी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे, की चुलती सविता जाधव हिने आमच्या घराच्या समोर शेकोटी केली होती. ती शेकोटी का केली असे विचारले असता सविता राजेंद्र जाधव, रितेश राजेंद्र जाधव व कोमल राजेंद्र जाधव या सर्वांनी बेदम मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# ट्रॅक्टर आडविल्याच्या कारणावरून नऊ जणांकडून दोघांना मारहाण

करमाळा (सं.प्र.) : ऊसाचा भरलेला ट्रॅक्टर का आडवला, या कारणावरून सातोली येथे सुहास रामचंद्र साळुंके, नितीन साळुंके, योगेश साळुंके, दत्तात्रय साळुंके, नानासाहेब साळुंके, विश्वंभर साळुंके, वैभव तळेकर, आण्णा पवार, विष्णू तळेकर (सर्व रा.सातोली) यांनी फिर्यादी संतोष दादा फरतडे व वडील दादा उर्फ बिभिषण फरतडे यांना कोयता, केबल व गजाने बेदम मारहाण करून त्यांच्या खिशातील पाच हजार रूपये काढून नेले आहेत. या प्रकरणी संतोष फरतडे यांनी फिर्याद दिली आहे.

# शहरातून मोटारसायकलची चोरी

करमाळा(सं.प्र) : करमाळा शहरातील करमाळा पॅलेस हॉटेल जवळ लावलेल्या मोटारसायकलची भरदिवसा चोरी झाली आहे. हा प्रकार २५ नोव्हेंबरला घडला आहे. या प्रकरणी ठेकेदार अमोल चंद्रकांत पाटील यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आमचा स्टाफ संतोष नवनाथ जगदाळे (रा.डोणपारगाव, ता.जामखेड) हा मोटारसायकल क्र.एमएच ४५ एएच ९८६१ ही गाडी करमाळा पॅलेस जवळ शिशिर अपार्टमेंट जवळ सकाळी नऊ वाजता लावली होती. सायंकाळी पाच वाजता जाताना सदरची मोटारसायकल चोरट्यांनी चोरून नेली आहे.



गीर गाईचे प्युअर दुध मिळेल.

मो.9822058106

## माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त

# म.गांधी शैक्षणिक संकुलात तालुकास्तरीय आंतरशालेय डान्स स्पर्धा संपन्न






करमाळा(सं.प्र.): करमाळा तालुका एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त तथा भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शंभुराजे जगताप यांच्या संकल्पनेतून माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त महात्मा गांधी शैक्षणिक संकुलात भव्य तालुकास्तरीय आंतरशालेय डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांचे हस्ते झाले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, माजी उपनगराध्यक्ष ॲड.कमलाकर वीर, सरपंच तानाजी झोळ, माजी नगरसेवक डॉ.श्रीराम परदेशी, भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, सुहास घोलप, बाळासाहेब कुंभार, संजय घोरपडे,बाजार समितीचे संचालक नागनाथ लकडे, आण्णासाहेब पवार, शिवाजी राखुंडे, वालचंद रोडगे, बाजार समितीचे सचिव विठ्ठल क्षीरसागर, सहसचिव रविंद्र उकिरडे, खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष जनार्दन नलवडे, पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, जोतीराम ढो, रामा ढाणे, पै.अफसर जाधव, शहाजी शिंगटे, देविदास वाघ, संदीप शेळके, अनिल पिंपरे, निखिल ढावरे आदी मान्यवर उपस्थित होते.

पाहूण्यांचे स्वागत शंभुराजे जगताप यांनी केले. प्रभारी प्राचार्य अनिस बागवान यांनी प्रास्ताविक केले. या स्पर्धेत वैयक्तीक व सांघिक नृत्य प्रकार सादर करण्यात आले. पारदर्शी मुल्यमापनाकरीता कोडींग पध्दत अवलंबली होती. या स्पर्धेत तालुक्यास्तरातून लहान व मोठ्या गटातून ४१ सामुहिक व वैयक्तीक नृत्य प्रकार सादर करण्यात आले.




बेटी बचाओ-बेटी पढाओ, देश रंगीला, लावणी नृत्य, रिमिक्स गाण्यावरील नृत्य, कथ्थक नृत्य, लावणी, देवीच्या गाण्यावरील नृत्य, राजस्थानी नृत्य, भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणारे नृत्य तसेच पाश्चिमात्य नृत्य आदी नृत्य प्रकार सादर करण्यात आले. या स्पर्धेसाठी रिलस्टार व युट्यूब स्टार विक्रम आलाट, डान्स मास्टर अक्षय कांबळे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा देशभक्त कै.नामदेवराव जगताप यांच्या जयंतीदिनी संपन्न होणार आहे.

या स्पर्धेला जोडूनच १२ डिसेंबरला सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये म.गांधी प्री-प्रायमरी इंग्लीश मेडियम स्कुलच्या चिमुकल्यांनी तर अक्षरश: उपस्थितांची मने जिंकली. म.गांधी विद्यालय, तांत्रिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स या सर्व युनिट मधील विद्यार्थ्यांनी अप्रतिम सादरीकरण केले. शहर व तालुक्यातील पालक व रसिक प्रेक्षकांनी या भरगच्च कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. या कार्यक्रमासाठी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला. नगरपालिकेचे फायरब्रिगेड सुध्दा तैनात होते. कुटीर रूग्णालयाने आपतकालीन व्यवस्थेचा भाग म्हणून रूग्णवाहिका उपलब्ध करून दिली होती. एम.एस.ई.बी.नेही अखंडीत वीज पुरवण्याचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.विजय पवार, निवेदक सचिन नवले, प्रा.दत्तात्रय भागडे यांनी आलटून-पालटून केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्र.प्राचार्य अनिस बागवान, पर्यवेक्षक बी.के.पाटील, पर्यवेक्षिका सुनिता नवले, विज्ञान शाखा विभाग प्रमुख विजय पवार, सर्व सहशिक्षक, सहशिक्षिका, कर्मचारी व किंग्ज ग्रुपचे सदस्य यांनी परिश्रम घेतले.

## मांगी तलाव संदर्भात खा.नाईकनिंबाळकर यांची दिल्लीत बैठक

# १५ जानेवारी पर्यंत कुकडी प्रकल्पात विलीनीकरणाबाबत अहवाल येणार : श्री.चिवटे

करमाळा(सं.प्र.) : खा.रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या प्रयत्नामुळे १५ जानेवारी पर्यंत मांगी तलाव कुकडी प्रकल्पात विलीनीकरण अहवाल येणार असल्याची माहिती भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांनी दिली. मांगी तलाव संदर्भात खा.नाईकनिंबाळकर यांची दिल्ली येथे बैठक पार पडली. मांगी तलाव कुकडी प्रकल्पात कायमस्वरूपी विलीन करण्याची मागणी या भागातील नागरीक अनेक वर्षापासून करीत होते. परंतु या मागणीला यश येत नव्हते. परंतु खा.नाईकनिंबाळकर यांचे करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांनी या संदर्भात जून २०२३ मध्ये मागणी केली होती. खा.नाईकनिंबाळकर यांनी लक्ष घालून संपूर्ण कुकडी प्रकल्पाचे फेरजलनियोजन करण्याचे नियोजन केले. राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करून घेतला. तसेच नुकतीच दिल्ली येथे वेबकॉस संस्थेचे सीईओ शंभु आझाद यांच्या सोबत बैठक झाली. या बैठकीत मांगी तलाव संदर्भात चर्चा झाली. तसेच या संस्थेचा अहवाल १५ जानेवारी पर्यंत तयार होऊन मांगी तलाव कुकडी प्रकल्पात अधिकृत कायमस्वरूपी विलीन होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. मांगी तलावाचे कुकडीमध्ये विलीनीकरण झाल्यास या तलावावर अवलंबून असलेल्या २५-३० गावातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे; असे मत भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांनी व्यक्त केले.

# श्रध्दा पवार विज्ञान प्रदर्शनात तालुक्यात प्रथम



करमाळा(सं.प्र.) : तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहावी ते आठवीच्या दिव्यांग गटातून झरे येथील नामदेवराव जगताप माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीनी श्रध्दा तानाजी पवार हिचा सोलर ट्रक हा प्रयोग प्रथम क्रमांकाने निवडला गेला. त्या प्रयोगाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. यासाठी तिला शिक्षक अक्षय ढेरे व धनंजय चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष बन्सी आबा घाडगे यांनी श्रध्दा पवार व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

घर विकणे आहे
कर्जत रोड वरील नागोबा मंदिर जवळील दोन मजली घर योग्य किंमतीत विकणे आहे
संपर्क
9922111155, 9767811155

MEHER EYE & DENTAL HOSPITAL
मेहेर नेत्र ॲन्ड दंत हॉस्पिटल
बायपास रोड, शिंदे हॉस्पिटल शेजारी, करमाळा. मो.७८७५६१९६९६

| डॉ.हितेश बाळासाहेब मेहेर | डॉ.नेहा हितेश मेहेर(देवकर) | डॉ.पुनम शैलेश मेहेर(गोरे) |
|---|---|---|
| MBBS. MS OPHTHALMOLOGY | BDS (DENTAL SURGEON) | BDS (DENTAL SURGEON) |

• कॉम्प्युटरद्वारे नेत्र तपासणी
• मोतीबिंदू, काचबिंदू(फेको) स्पेशालिस्ट
• अद्ययावत ऑपरेशन थिएटर
• रूट कॅनाल ट्रीटमेंट,
• कवळी बसविणे, बालदंत समस्या
• हिरड्यांची शस्त्रक्रिया

अनंत ऑप्टीशियन्स
डॉ.आंबेडकर शॉपींग सेंटर, भाजी मंडई जवळ करमाळा.(९४२३३३३९६०, ९९६०९७७३०६)
-सर्व प्रकारच्या नंबरचे चष्मे,
-गॉगल्स मिळतील. अत्याधुनिक
-मशिनद्वारे चष्मे फिटींग

# कंदर येथे २५ डिसेंबरला जन्मशताब्दी अभिष्टचिंतन सोहळा

## शरद पवार, सुशिलकुमार शिंदे, ना.चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार



करमाळा (सं.प्र.) : श्री समर्थ सद्गुरू शिवलाल स्वामी महाराज सोलापूरकर यांच्या जन्मशताब्दी अभिष्टचिंतन सोहळा २५ डिसेंबरला कंदर येथे होणार आहे. यावेळी माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे, पालकमंत्री तथा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रमुख उपस्थितीसह राज्यातील अनेक आजी व माजी आमदार, खासदार तसेच विविध स्थानिक स्वराज्य संस्थेचे आजी व माजी पदाधिकारी एकत्र येणार आहेत. श्री समर्थ सद्गुरू शिवलाल स्वामी महाराज सोलापूरकर यांचा जन्मशताब्दी अभिष्टचिंतन सोहळा २५ डिसेंबरला कंदर येथे सायंकाळी ७ वा. २५ मिनिटांनी संपन्न होणार आहे. या सोहळ्यास विठ्ठल-रूक्मीणी मंदिर समिती पंढरपूरचे उपाध्यक्ष गहिणीनाथ महाराज औसेकर, श्री क्षेत्र इंचगिरी कर्नाटकचे मठाधिपती रेवणसिध्देश्वर महाराज, तुकाराम महाराजांचे वंशज कान्होबा महाराज देहूकर, आजरेकर फड पंढरपूरचे प्रमुख भागवत महाराज चवरे, माणकोजी बोधले संस्थानचे ॲड.जयवंत बोधले महाराज, वासकर फड प्रमुख राणा महाराज वासकर, अ.भा.भाट संघटनेचे अध्यक्ष सुनील मलके व जगदीश दादा महाराज कोल्हापूरकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यास तालुक्यासह जिल्ह्यातील नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे; असे आवाहन श्री समर्थ सद्गुरू शिवलाल स्वामी महाराज सोलापूरकरचे सर्व साधक, भक्तगण यांनी केले.

## श्री दत्त जयंतीनिमित्त
# दत्तमंदिर विकासनगर येथे २० डिसेंबर पासून हरिनाम सप्ताह सुरू



करमाळा(सं.प्र.) : सालाबादप्रमाणे याहीवर्षी श्री दत्तमंदिर विकासनगर, करमाळा येथे श्री दत्त जयंतीनिमित्त २० डिसेंबर ते २७ डिसेंबर या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहात पहाटे काकडा, सकाळी गुरूचरित्र पारायण, दुपारी गाथा भजन, सायंकाळी हरिपाठ, प्रवचन, रात्री किर्तन व नंतर जागर असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. या सप्ताह मध्ये ह.भ.प.विलास महाराज राठोड, डॉ.ॲड.बाबूराव हिरडे, मीराताई फंड, सत्यभामा बनसुडे, तात्यासाहेब महाराज कांबळे, दिनेश महाराज किरवे यांचे प्रवचनाचे तसेच ह.भ.प.दत्ता महाराज नंदरगे, राधाताई भांडवलकर, अनिरूध्द महाराज निंबाळकर, बबन महाराज विंचू, विनायक महाराज मारकड, कानिफनाथ महाराज आगम यांचे किर्तनाचे कार्यक्रम होणार आहेत.

दत्तजयंतीनिमित्त २६ डिसेंबरला सकाळी आठ ते दहा रूद्राभिषेक होणार असून दुपारी चार ते सहा ह.भ.प.भरत महाराज मोरे यांचे जन्मकिर्तन होणार आहे. तसेच २७ डिसेंबरला सकाळी दहा ते बारा बळीराम महाराज वायकर यांचे काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. तरी या हरिनाम सप्ताहाचा लाभ भाविकांनी घ्यावा; असे आवाहन श्री दत्त जयंती उत्सव समितीने केले आहे.

न्यु संगम हॉटेल & बेकर्स
प्रोप्रा : संदीप चुंग (9860670816)



मिठाई, नमकीन बरोबर आता
- वाढदिवसाचे केक
- सुट्टी खारी, टोस्ट, बटर, ब्रेड
- मस्का पाव व वाटी केक

मिळतील. एकवेळ अवश्य भेट द्या..!



पत्ता : पंजाब वस्ताद चौक, करमाळा.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना श्रीजय नेत्र रूग्णालय



डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A



करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध

श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# पोथरे ग्रुप ग्रा.पं.च्या सरपंच पदी अंकुशराव शिंदे



करमाळा(सं.प्र.) : पोथरे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी अंकुशराव शिंदे यांची बिनविरोध निवड झाली आहे. ते माजी आमदार नारायण आबा पाटील गटाचे समर्थक आहेत. यापुर्वी बागल-पाटील युतीतील सरपंच धनंजय झिंजाडे यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर झालेल्या रिक्तपदी १२ डिसेंबरला त्यांची सरपंच पदी बिनविरोध निवड झाली आहे.

ग्रामपंचायत निवडणुकीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मंडल अधिकारी विनोद बनसोडे, ग्रामविकास अधिकारी हरीभाऊ दरवडे तसेच गावकामगार तलाठी सोमनाथ खराडे व एच.बी.शेंगळे, पोलीस पाटील संदीप शिंदे-पाटील हे होते.

पोथरे-निलज ही ग्रुप ग्रामपंचायत आहे.१३ जागेसाठी निवडणुक झाली. त्यामध्ये बागलगटाचे सात, पाटील गटाचे दोन, जगताप गटाचे दोन तर विद्यमान आमदार शिंदे गटाचे दोन सदस्य निवडूण आले होते. त्यानंतर पाटील-बागल युतीचे धनंजय झिंजाडे हे प्रथम सरपंच झाले होते. अडीच वर्षाचा कालावधी संपल्यानंतर युतीत ठरल्यानुसार श्री. झिंजाडे यांनी राजीनामा दिला होता. त्यानंतर रिक्त झालेल्या सरपंच पदाची निवडणूक १२ डिसेंबरला जाहीर झाली होती. त्यानुसार सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात निवडीची प्रक्रिया सुरू झाली. त्यामध्ये सरपंचपदासाठी श्री.शिंदे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. सर्व प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर दुपारी २ वाजता निवडणुक निर्णय अधिकारी बनसोडे यांनी श्री.शिंदे बिनविरोध सरपंच निवडल्याचे जाहीर केले. निवड झाल्यानंतर नुतन सरपंच अंकुश शिंदे यांनी सर्व सदस्यांचे मनापासून आभार व्यक्त केले. गटातटाचा विचार न करता आपण जे पद दिले त्या पदाला योग्य न्याय देवून गावाचा जास्तीत जास्त विकास करू; असे सांगितले.

यावेळी सदस्य म्हणून मावळते सरपंच धनंजय झिंजाडे, उपसरपंच दिपाली जाधव, सदस्य सुनिता विशाल झिंजाडे, दिपाली शांतीलाल झिंजाडे, जनाबाई पाराजी शिंदे, रेखा आदिनाथ झिंजाडे, राणी दत्तात्रय काळे, विठ्ठल नारायण शिंदे, रघुवीर बबन जाधव,संतोष पोपट ठोंबरे , सुनिता अनिल गायकवाड (निलज)व संजय जाधव (निलज)हे सदस्य उपस्थित होते.

यावेळी माजी चेअरमन प्रभाकर शिंदे, आदिनाथचे संचालक प्रकाश पाटील, माजी सरपंच सोपनकाका शिंदे, हरिश्चंद्र झिंजाडे, विष्णू रंदवे, ज्ञानदेव नायकोडे, माजी उपसरपंच जयद्रथ शिंदे, विशाल झिंजाडे, पै.धनराज शिंदे, रावसाहेब शिंदे-पाटील, गोपीनाथ पाटील, पै.सुरेश शिंदे, आण्णा पाटील आदीजण उपस्थित होते. या निवडीनंतर सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने नुतन सरपंच श्री. शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच हॉलीबॉल संघाच्या वतीने सरपंच शिंदे यांचा सत्कार केला.

### पोथरे ग्रा.पं.वर पहिलाच अभियंता सरपंच

पोथरे ग्रुप ग्रामपंचायतीच्या इतिहासात प्रथमच उच्च शिक्षित व अभियंता अंकुशराव गंगाराम शिंदे यांची सरपंच म्हणून निवड झाली आहे. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीवर मात करत त्यांनी अभियंता ही पदवी मिळवली. ते त्यांच्या परिवारातील तसेच संपूर्ण शिंदे परिवारातील पहिले अभियंता आहेत. पाटबंधारे विभागात अभियंता म्हणून सेवा केल्यानंतर त्यांनी प्रथमच ग्रामंपाचयतीच्या निवडणुकीत भाग घेतला . माजी आमदार नारायण पाटील गटांकडून ते सदस्य म्हणून निवडून आले. सुरूवातीला उपसरपंच म्हणून सव्वावर्षे काम पाहिले. त्यानंतर झिंजाडे यांनी सरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर बागल गटाकडून रघुवीर जाधव यांना सहा महिने सरपंच करण्याचा अट्टाहास चालवला होता. श्री.शिंदे यांनी बागल गट वगळता, पाटील गट, आ.शिंदे गट व जगताप गट यांचेसह बागल गटाचे दोन सदस्य आपल्या बरोबर घेऊन अज्ञातस्थळ गाठले होते. त्यामुळे नाविलाजास्तव बागल गटास ऐनवेळी शिंदे यांना पाठींबा द्यावा लागला आहे. उच्च शिक्षित सरपंच झाल्यामुळे ग्रामस्थांच्या शिंदे यांचेकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

# 'स्त्री' म्हणजे काय ?



एका संध्याकाळी..,
सूर्य डुबत असताना एका आजीला
तिच्या नातीने विचारले...
'आज्जी स्त्री म्हणजे काय असतं गं ?'
सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्याने...
मोतीबिंदू झालेल्या डोळ्याने...
ती झटकन बोलली...,
स्त्री सुध्दा एक मनुष्य असते,
तिला तिचेही आयुष्य असते,
तुडवली तर नागीण असते
डिवचली तर वाघीण असते
कडाडली तर वीज असते
तान्ह्या बाळाची नीज असते
आणि बरं का पोरी
तिच्या गर्भातच
भविष्याचे बीज असते

**....सौ.सुनंदा सुरेश जाधव**
**(मुख्याध्यापिका, नामसाधना प्राथ.विद्यामंदिर न.पा.सेंट्रल स्कुल मुले नं.१ करमाळा)**

# रिक्षा चालक ते यशस्वी उद्योजक

## सचिन देशमुख यांचा जीवन प्रवास

जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी फार मोठे शिक्षण घ्यावेच लागते असे काही नाही. कष्ट, जिद्द व योग्य दिशेचे प्रयत्न असले की माणूस यशाचे शिखर गाठतो. अशाचप्रकारे आपले जीवन यशस्वी करणारे सावडी येथील उद्योजक सचिन भगवान देशमुख हे आहेत.

श्री.देशमुख यांचे लहानपण व शिक्षण सावडी येथे झाले. घरची परिस्थिती बेताची होती त्यामुळे त्यांना जादा शिक्षण घेता आले नाही. त्यांचे मोठे बंधू दिलीपराव देशमुख हे पुणे येथे रिक्षा चालवत होते. त्यामुळे सचिनशेठ हेही पुणे येथे गेले व त्यांच्या सोबत रिक्षा चालवू लागले. रिक्षा चालवत असतानाच एका केटर्सकडे काम करू लागले. काम करतानाच सर्वांशी जुळवून घेण्याची त्यांची सवय असल्याने त्यांचे सर्वांशी चांगले संबंध निर्माण झाले. तसेच हडपसर परिसरात त्यांचा परिचय वाढला. त्यातूनच त्यांनी स्वत:चे त्रिमुर्ती केटरर्स नावाचा व्यवसाय सुरु केला. हळूहळू या व्यवसायाचे नाव पुणे परिसरात प्रसिध्द झाले. कमी खर्चात उत्तम नियोजन व


(9960717177)

स्वादिष्ट स्वयंपाक यामुळे त्यांचा ग्राहक वाढला. ही प्रसिध्दी नगरसेवक, आमदार, मंत्री यांच्या पर्यंत गेली आणि त्यातूनच त्यांच्या पाठीवरती खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची कौतुकाची थाप पडली. त्यांच्या या कामातून त्रिमुर्ती केटरर्सचा व्याप हळूहळू शहरभर पसरला. व्यवसाय वाढला, उत्पन्न वाढले, हाताशी दोन पैसे आले. त्यानंतर त्यांनी आपल्या गावाकडे म्हणजे सावडी येथे काही ना काही मदत करण्याचे काम सुरू केले. त्यातूनच सावडी येथील हरिनाम सप्ताह मध्ये अन्नदान, प्राथमिक शाळेत १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला विद्यार्थ्यांना खाऊ व अन्नदान, अंगणवाडी व हायस्कुलमधील विद्यार्थ्यांना खाऊ वाटतात, टिफीन देतात. गावाच्या यात्रेतील कुस्तीच्या आखाड्यालाही त्यांची मदत असते. गावातील जवळपास शंभर लोकांना त्यांनी पुणे येथे रोजगार व सन्मान दिला आहे. या त्यांच्या कार्यामुळे ग्रामस्थ त्यांना

केटरींगचा व्यवसाय करत त्यांनी मंगल कार्यालय सुरू केले. त्यातही त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. हडपसर परिसरात प्रथम इंद्रप्रस्थ लॉन्स घेतले. नंतर नेताजी लॉन्स हेही घेतले. त्यानंतर लोणी काळभोर टोल नाक्या जवळचे गुलमोहर लॉन्स हेही त्यांनी घेतले आहे. सावडी सारख्या सामान्य गावातून पुणे येथे रिक्षा चालविण्यास गेलेल्या तरूणाचे पुणे येथील तीन मंगल कार्यालयाचे मालक होणे ही साधी गोष्ट नाही. नोकरी नाही, भांडवल नाही म्हणून हाताश होण्यापेक्षा जिद्द व मेहनतीच्या जोरावर सचिनकाका सारखे यश मिळवता येते; हे ही सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

सचिनकाका म्हणून ओळखतात. २० डिसेंबर रोजी सचिनकाका यांचा वाढदिवस असून त्यानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा !

...इन्नुसभाई शेख, सावडी
(मो.७०३८६८२१२१)

# आई...

आई तुझ्या स्मृतिविना क्षणही जात नाही. कारण या संसारात सृष्टीमध्ये सर्वात सुंदर असा शब्द आहे तो 'आई'!

'आई' हा शब्द उच्चारताच अंत:करण भरून येते. वाणी माधुर्याने मधाळ बनते आणि डोळ्यातून गंगा, यमुना वाहण्यास सुरुवात होतात. आई तुझ्या- शिवाय मी काहीच नाही. माझ्या आयुष्यातील यशाच्या शिड्या तुच माझ्यासाठी बनवल्या. परमेश्वरा तुला प्रार्थना करतो की.. 'प्रत्येक जन्मी मला हीच आई हवी !'

मी लहान असताना तिच्याकडे जो उत्साह आणि ऊर्जा होती, तेवढीच ऊर्जा शेवटपर्यंत तिच्याकडे होती. उत्साही जगायला पैसे लागत नाहीत. लागते फक्त या जन्मावर शतद: प्रेम करण्याची आसक्ती !

आई तिच्या वैजयंतीमाला सारखीच दिसायला व दोन भावंडाबरोबर खुप लाडात वाढलेली. तिच्या लहानपणाचे केडगाव येथील किस्से तिच्या तोंडून ऐकताना तिची आजी, आजोबा आणि मामा यांचेवर आतोनात असलेल्या प्रेमाची प्रचिती समजत होती. आईला चार मामा व सहा मावशा असा खूप मोठा प्रेमळ परिवार आहे.

आईच्या लग्नानंतर सावडी येथील प्रवास खडतर. पण तिच्या ज्या सहजतेने



आयुष्यातील समस्यांना वाट करून दिली ते आठवले की आजही हृदय भरून येते.

आईने प्रतिकुल परिस्थितीतून सर्वात मोठी बहिण रेखा, मोठा स्व.डॉ.महावीर व मला खूप प्रेमाने वाढवले. खरंतर आम्ही तिघंही भावंड भाग्यवान आहोत की अशी आई आम्हाला मिळाली. आम्हा तिघांनाही तिनं उच्चशिक्षित केलं. बहिण एम.कॉम, मोठा भाऊ डॉक्टर तर मी इंजिनियर. आमचे जीवनसाथीही तिने इंजिनियर व डॉक्टर असेच निवडले.

आईला काही संकटं सहन करावी लागली. नाशिक - त्र्यंबकेश्वरला दर्शनाला गेले असताना अपघातात आजी गेली.कालांतराने तिच्या बाबाचाही मृत्यू झाला. पुढे आपल्या मोठ्या मुलीला ३२ व्या वर्षी सौभाग्य गमवल्यावर रुढी, परंपरा बाजुला ठेवून बहिणीचा पुनर्विवाहाचा निर्णय तिने घेतला. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतून डॉक्टर म्हणून कार्यरत असताना हिऱ्यासारखा डॉ.महावीर या मुलाला तिने गमावले. सख्ख्या भावावर तिची अतुट माया होती, तोही भाऊ तिला सोडून गेला. अशा संकटांना सामोरे जात तिनं वाटचाल केली.

तीन हजार लोकवस्तीच्या सावडी सारख्या गावात महिला असून तिने संघर्ष करून गावचं सरपंच पद हासिल केलं. एवढंच नाहीतर त्यातून तिने अनेक सामाजिक उपक्रम राबविले. शिवसेनेचे तालुका महिला प्रमुख म्हणूनही आईनं चांगलं काम केलं होतं. वेगवेगळ्या संस्थांवरती ती कार्यरत होती. अशातच तिला मुत्रपिंडाचा आजार झाला. जवळजवळ बारा वर्षे आठवड्यातून तीन वेळा एकही खाडे न करता १७०० वेळा डायलेसिस करावे लागले. प्रत्येकवेळी ती अद्भूतपणे व लढाऊवृत्तीने सामोरे गेली. माझ्या आईच्या आजारपणात डॉ.सदरे, डॉ.हुपरीकर, डॉ.वैभव मेहता, डॉ.राका, डॉ.जाधव यांनी खूप सहकार्य केले. मुकुंदनगर येथील लायन्स क्लबने सारस डायलेसिस सेंटरची सुविधा उपलब्ध करून दिली. त्या सेंटरच्या स्टाफने खूप सहकार्य केले. अखेर एक लढवय्यी माता आम्हाला सोडून १७ डिसेंबर २०२२ ला गेली.

आई आज आमच्यात नसलीतरी तिचा आशिर्वाद आणि तिचे विचार कायम आमच्या सोबत आहेत. तिच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भावपूर्ण श्रध्दांजली !

***

**...आनंद अब्बड (सावडी-पुणे)**

# ग्रामायण भाग-४

हॉस्पिटलचे बांधकाम स्लॅब लेवलला आले होते. पण त्यावेळी सिमेंट मिळत नव्हते. तत्कालीन जिल्हाधिकारी करंदीकर यांना ट्रंक बुकींगने फोन केला. त्याकाळी मोबाईल नव्हतेच. अपॉईमेंट घेतली आणि भेटलो. त्यांना सर्व बाब व्यवस्थितरित्या समजावून सांगितली. पंचविशीचा तरूण डॉक्टर तीन हजार लोकवस्तीच्या खेड्यात रूग्णालय सुरु करतोय याचे त्यांना कौतूक वाटले. तात्काळ जिल्हाधिकारी कोट्यातून खास बाब म्हणून त्यांनी चारशे पोती सिमेंट मंजूर केले. कोणतीही अपेक्षा नाही, उलट अडचण आल्यास आवश्य भेट हा विश्वास दिला. सिमेंटचे परमीट पंढरपूरच्या वेअरहाऊसचे होते. मी व वडील पंढरपूरला गेलो. दोन ट्रक मध्ये सिमेंट भरले व दोन्ही ट्रक गावी उशीरा आणल्या. सिमेंट कोठे ठेवायचे ? हा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी भारत हायस्कुलचे मुख्याध्यापक कदम सर यांना भेटलो. त्यांनी वसतिगृहाच्या वापरात नसलेल्या दोन खोल्या विनामुल्य दिल्या. बांधकामासाठी वीट दौंड वरून, स्टाईल्स् बार्शीवरून, काही सामान पुणे येथून, सिमेंट पंढरपूर वरून अशा वेगवेगळ्या ठिकाणाहून वेगवेगळ्या वस्तु येत होत्या. असे लोग मिलते गए, कारवा चलता गया ! (क्रमश:)

**..डॉ.सुभाष सुराणा, जेऊर (8975549060)**




# घोटी महिला गृहउद्योग समुह, घोटी ता.करमाळा.

## पाहिजेत.! पाहिजेत.!! पाहिजेत.!!!

घोटी महिला गृहउद्योग समुह मध्ये सर्व प्रकारचे मसाला उद्योग, बेकरी उत्पादने, नमकीन स्नॅक्स, पाऊच, वेफर्स, शेवई, नुडल्स, लोणचे, पापड, कुरडई, सांडगे साल पापड्या तसेच हॉटेल, ढाबा, किराणा स्टोअर्ससाठी लागणारे २०० हून अधिक उत्पादने करण्यासाठी खालीलप्रमाणे पदे भरण्यात येणार आहेत.

| क्र. | पद | शैक्षणिक पात्रता | स्त्री/पुरूष | पदे | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | डे.जनरल मॅनेजर | HM हॉटेल मॅनेजमेंट | महिला | १ | २१००० ते ३०००० |
| २ | डे.मार्केटींग मॅनेजर | HM किंवा अनुभव | स्त्री/पुरूष | २ | १८००० ते २७००० |
| ३ | डे.फायनान्स मॅनेजर | JDCA किंवा अनुभव | स्त्री/पुरूष | २ | १८००० ते २७००० |
| ४ | डे.प्रोडक्सन मॅनेजर | HM किंवा B.sc | महिला | ३ | १५००० ते २३००० |
| ५ | ऑफिस क्लार्क | B.A./B.com/B.sc | महिला | ६ | १२००० ते २०००० |
| ६ | सुपरवाईजर प्रोडॅक्सन | १२ वी पास | महिला | ६ | ९००० ते १६००० |
| ७ | सहाय्यक प्रोडॅक्स | ७ वी पास | स्त्री/पुरूष | २५ | ८००० ते १५००० |

**वेतन कमीत कमी ते आपल्या सहकार्यावर जास्तीत जास्त वाढणार आहे.**

**सूचना...**

१) इच्छुकांची वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत असेल. अर्ज विहित नमुन्यात लिहून फोटो व आधारकार्ड तसेच पासपोर्ट फोटो व्हॉटस्अप करावा.
२) बेकरी उत्पादने, दुध उत्पादने, मसाला उद्योग, आचारी काम किंवा कोणताही उद्योगातील अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
३) कर्मचाऱ्यांची येण्या-जाण्याची व्यवस्था म.गांधी हायस्कुल, करमाळा पासून घोटी पर्यंत केली जाईल.
४) मुलाखतीचा दिनांक व पत्ता आपणांस कळविण्यात येईल. संपर्कासाठी व्हॉटसअप नंबर अर्जामध्ये नमूद करावा.

* नियम व अटी लागू

**संपर्क: मो.7350554055, 9689810855**